---

प्रा.डॉ.सौ.विमल के. पाटील
एम.ए.बी.टी.,पीएच.डी.
छत्रपती शिवाजी महाविद्यालय,
सातारा (महाराष्ट्र)

---

## प्र मा ण प त्र

श्री.गुलाबराव तात्याबा शेळके यांनी "धनगरी लोकगीतांचा अभ्यास" (सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसराच्या अनुषंगाने) या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली हा लघु शोध प्रबंध स्वतःच पूर्ण केला आहे. त्यांचे लघु शोध प्रबंधाचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री आहे. हा लघु शोध प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. मराठीच्या पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे.

स्थळ : सातारा

दिनांक : ३० . ३ . १९९९

प्रा.डॉ.सौ.विमल के. पाटील
मार्गदर्शिका
छत्रपती शिवाजी महाविद्यालय
सातारा.

---

Principal, M. K. Yadav,
Chh. Shivaji College,
Satara , (Maharashtra)

## CERTIFICATE

---

This is to certify that Shri.Gulabrao Tatyaba Shelke was a regular student of M.Phil (Marathi) during the academic year 1996-97 and 1997-98. To the best of my knowledge he bears a good moral character.

Principal,

Place - Satara

Date - 30 MAR 1999

CHHATRAPATI SHIVAJI Jr. COLLEGE SATARA

Chh. Shivaji College,
Satara.

---

# प्रतिज्ञापत्र

"धनगरी लोकगीताचा अभ्यास" (सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसराच्या अनुषंगाने) या विषयावरील लघु शोध प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल.(मराठी) या पदवी परीक्षेसाठी लिहला आहे. हा लघु शोध प्रबंध अथवा त्यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. माझे संशोधन काम ही स्वतंत्र निर्मिती असून माझ्या माहितीप्रमाणे शिवाजी किंवा अन्य कोणत्याही विद्यापीठात या विषयावर प्रबंध सादर झालेला नाही.

श्री.गुलाबराव तात्याबा शेळके

अभ्यासक

छ.शिवाजी महाविद्यालय,

सातारा.

स्थळ : सातारा

दिनांक : ३०.३.१९९९

---

## भूमिका आणि मनोगत

---

भारत देश सर्वाथाने समृध्द असा देश आहे. प्राचीन परंपरा लाभलेल्या भारतीय संस्कृतीची पाळेमुळे येथील जनमानसात खोलवर रूजलेली आहेत. अनेक भाषा, विविध जाती–जमाती आणि विविध धर्माचे लोक असूनही येथील सर्वांचा आत्मा कलावंताचा आहे. भारताच्या मातीतून गीत जन्माला येत. त्या गीतांना संगीताचा सुगंध असतो आणि म्हणूनच या मातीत जन्मलेला प्रत्येक कलावंत त्याच्या मधुर स्वराच्या साथीने अभिनयाचा व नृत्याचा आविष्कार घडवून लोकांचे मनोरंजन करतो. मातीशी इमान राखणारा हा कलावंत स्वतःच्या पोटाची खळगी भरण्यासाठी लोकरंजन करतो. धनगर हा एक असाच कलावंत आहे.

दक्षिणेतल्या समाजरचनेतला अत्यंत महत्वपूर्ण समाज म्हणजे महाराष्ट्रात सर्वपरिचित असलेला धनगर समाज होय. आपण कधीही, कोठेही प्रवासास गेलो आणि सहज गाडीतून बाहेर डोकावले तर आपणास शेळयामेंढयांचे कळप घेऊन त्यांना रानामाळावर, झाडाझुडपात चारत खांद्यावर घोंगडे व हातात काठी घेऊन, डोक्याला तांबडा पटका असलेले धनगर आढळतात.

भाऊसाहेब पेशव्याच्या कारकिर्दीपर्यंत मल्हारराव होळकर यांनी पेशवाईतील बहुतेक सर्व चढउतार पाहिले, अनुभवले व आपल्या पराक्रमाने गाजविले होते. अहिल्याबाईंना तर आदर्श राज्यकर्ती म्हणून किताबच मिळालेला आहे. तत्कालीन समाजात त्यांनी केलेल्या सुधारणा या वर्षानुवर्षे चिरंतन राहण्यासारख्या आहेत हे सर्वांना माहिती आहे. आजही धनगर समाजाला या दोनही व्यक्तीबद्दल विलक्षण आदर, प्रेम व अभिमान आहे व असणे स्वाभाविक आहे. अशी या समाजाला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे.

"धनगर समाजाला हजारो वर्षाची परंपरा असल्याची दिसून येते. समर्थ रामदासांनी या समाजातील अनेक देवस्थानांना भेटी देऊन या समाजातील लोकांना मार्गदर्शन केले आहे. तर त्यांच्याही अगोदर ज्ञानेश्वरांनी "माणसापेक्षा मेंढर बरी" असे सांगितले आहे. याच्याही पूर्वी आदीकाळात मानवाने आपल्या उदरनिर्वाहासाठी मेंढपाळ हा व्यवसाय फायदेशीर असल्याने सुरू केला. तो आजतागायत चालू आहे. म्हणून प्राचीन काळात मानवाच्या उदयाबरोबर मेंढपाळ या भटक्या व्यवसायाचा उदय झाला व पुढे हळूहळू विकसीत झाला. त्यामुळे या समाजाला हजारो वर्षाची परंपरा आहे हे दिसून येते.

प्राचीन काळात मनुष्य आपल्या उदरनिर्वाहासाठी सतत भटकंती करू लागला. भटकंती करीत असताना तो अनेक प्राण्यांची शिकार करू लागला. कालांतराने पुढे त्याला शिकार मिळेना म्हणून तो गरीब प्राण्यांना पाळू लागला व त्याची देखभाल करू लागला. तोच त्याचा व्यवसाय बनला. हळूहळू तो गरीब आणि ज्या प्राण्यापासून जास्त फायदे मिळतील अशाच प्राणी पाळू लागला. त्यात त्याने बकरी सारख्या गरीब प्राण्याला पाळले. त्यातूनच पुढे त्याला बकरीपासून लोकर, कातडे, मांस, रक्त हे फायदे मिळू लागले. म्हणून त्याने हा व्यवसाय निवडला. हा व्यवसाय करणारे लोक ते "धनगर" होय. म्हणजे मनाने मोठे असणारे लोक होय. ज्यांना फक्त समाजात चांगले करण्याची माहिती आहे असे लोक होय. असा या भटक्या समाजाचा इतिहास आहे. चराऊ कुरणाच्या शोधात सतत भ्रमण करणारी ही जमात सर्व महाराष्ट्रात भ्रमंती करताना आढळते."

प्रख्यात राजकुळे – राजघराणी यांचा उदय या समाजातून झाला आहे. स्वपराक्रमाने ही घराणी इतिहासामध्ये गाजलेली आहेत. व त्यांनी आपली राज्य प्राप्त केलेली आढळतात. भटकी जमात असुनसुध्दा व जीवनाला एका ठिकाणची स्थैर्यता नसतानासुध्दा स्वपराक्रमाने धनगर समाजाने क्षत्रियांच्या पराक्रमाबरोबर महाराष्ट्र गाजविला आहे. क्षत्रियांनी देखिल धनगर समाजाच्या तुल्यबळ पराक्रमाच्या सहाय्याने स्वराज्य प्रस्थापित केली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज ते पेशवाईअखेर महाराष्ट्राची जडणघडण या समाजाच्या सहाय्यानेच झालेली आहे. धनगर समाज मावळ–मराठयांच्या समाजाच्या हातात हात घालून वाटचाल करीत आलेला आहे. शिवाजी महाराजांच्या सैन्यात अनेक धनगरी मावळे होते हे आपणास ठाऊक आहेच. म्हणून धनगरी समाज हा धंद्याने व व्यवसायाने मेंढपाळ करणारा असला तरी तो महाराष्ट्रीय समाजाचाच एक अविभाज्य घटक आहे. हे विसरता येत नाही.

अशा या महाराष्ट्रातील धनगर हे महाराष्ट्राचे अत्यंत भाषिक, श्रध्दाळू पण अज्ञानी भटके निसर्गाशी बोलणारे, शेळयामेंढयांवर जिवापाड प्रेम करणारे हे धनगर लोक आहेत. मेंढया हा जीव की प्राण. म्हणून निसर्गाशी एकरूप झालेला हा समाज केवळ दैवावर व देवावर विश्वास ठेवणारा हा समाज विलक्षण भाबडा, भोळा, आकाशाच्या मायेखाली वावरणारा व धरतीमातेच्या अंगावर पाय रोवून असलेला समाज आहे. त्यामुळे मातीशी नाते त्याचे घट्ट असते. ऊन, वारा, पाऊस, याला न भिणारा व ते अंगावर झेलणारा, बळकट शरीरयष्टीचा धनगर समाज आहे.

धनगर समाज श्रध्दाळू, धार्मिक असल्यामुळे त्याचे अनेक देव हा त्याच्या जीवनाचा आधार आहे. बिरोबा, खंडोबा, मस्कोबा, वाग्देव म्हणजे त्याचा प्राणच होय. हे धनगराचे सर्व देव म्हणजे जागृत प्रचिती देणारे देव आहेत. या धनगरांच्या देवस्थानची प्रचिती जेजूरी गडावर नाना फडणवीसांना देखील आली होती. या गडावर नानांनी आपल्याला मूल व्हावे म्हणून नवस बोललेला होता. तर याच जेजूरी गडावर शहाजी–शिवाजीची भेट होऊन आपली मनोकामना धनगरी देवापुढे मांडली असल्याची कथा उपलब्ध आहे. वरील देव हे धनगराचे मूळ देव आहेत. या मूळच्या देवांचे वैभव राजकुलामुळे वाढले . उदा. विठ्ठलाचा – विष्णु कृष्णारूप "श्री विठ्ठल" झाला. मैलाराचा शिवरूप मल्हारी झाला आणि अनेक ठाण्यात वीरभद्राचा बिरदेव झाला.

औरंगजेबासारख्या खतरनाक शत्रुला देखील धनगराच्या खंडोबाला शरण जावे लागले होते. मठ–मंदिरे फोडण्यासाठी हिंदूच्या देवदेवांचे भंजन करण्यासाठी औरंगजेबाची नजर जेजूरीच्या खंडोबाकडे वळली. तेव्हा जेजूरीच्या खंडोबाने औरंगजेबाची त्रेधातिरपीठ कशी केली याचे वर्णन एका कथेत आले आहे.

खंडोबाने औरंगजेबाच्या अफाट सैन्यावर काळयाभोर भुंग्यांची अफाट फौज सोडली. तेव्हा कोणापुढे न नमणाऱ्या औरंगजेबाने खंडोबाची माफी मागितल्याची प्रस्तुत कथा श्रवणीय आहे.

धनगर समाजाच्या कौटुंबिक भावभावना, त्यांच्या श्रध्दा, अंधश्रध्दा त्यांच्या देवांचे, धर्माचे, त्यांच्या कथागाथांचे, त्यांच्या विक्रमी कर्तृत्वाचे गुणगान धनगरी लोकसाहित्यात प्रकट झाले आहे. धनगरांच्या लोकगीतांचा भावनिक ओलावा हृदयस्पर्शी आहे. त्यांच्या या सर्व जीवन आविष्काराचे जिवंत पडसाद दक्षिणेच्या सामाजिक, धार्मिक इतिहासात पहावयाला मिळते. त्यांच्या लोकजीवनाचे पडसाद विलक्षण रंजक, रोचक व उत्कट आहेत. धनगरांच्या लोकगीतातून जीवनाचा व्यक्त होणारा आविष्कार असाधारण आहे. आणि त्यामुळेच या गीतांना वाङ्मयीन सौंदर्य प्राप्त झाले आहे. धनगरी लोकगीतातून महाराष्ट्रातील धनगरांचे लोकजीवन, त्यांचे कडुगोड अनुभव त्यांना खावे लागणारे टक्के टोणपे, खडतर जीवन जगण्यासाठी त्यांनी केलेल्या जीवन संग्रामाचे चित्र महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास या सर्वांचे दर्शन घडते.

धनगराचे योगदान या संदर्भात विचारात घेतल्यास एका आगळया वेगळया जीवनाचे धनगरी गीतातून प्रत्ययकारी दर्शन घडणार आहे. धनगर समाज दलित, उपेक्षित, दुर्लक्षित समाजाप्रमाणे आज जागा झाला आहे.

नव्या युगाची आव्हाने स्विकारून स्वतःचे उत्थान घडविण्यासाठी आणि प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या समाजात बरोबरीचे स्थान मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असताना हा समाज स्वतःच्या आस्मितेचा शोध घेत आहे. हे रा.चिं.ढेरे यांचे विधान धनगर समाजाच्या जागृतीचे द्योतक आहे.

धनगरी लोकगीतांचा अभ्यास संशोधन पध्दतीने करून लोकगीतांचा जीवनाशी असलेला अन्योन्य संबंध स्पष्ट करण्याचा माझा या लेखनाचा उद्देश आहे. धनगरी लोकगीतांच्या इतिहासाच्या संदर्भात वेगवेगळया प्रेरणा, वैचित्र्य व विकास येथे पाहणे आवश्यक आहे. धनगरी लोकगीताचे दालन समृध्द व विकसनशील कसे झाले आहे ते पाहणे महत्वाचे वाटते.

धनगरी लोकवाङ्.मयाची अर्थात लोकगीतांची वाङ्.मयीन ज्योत कशी उज्वलपणे विकसित झाली आहे व पुढे ती कशी तेवत राहिल म्हणून धनगरी लोकगीतांचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते.

प्रस्तुत प्रबंधात धनगरी लोकगीताचा अभ्यास सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसराच्या अनुषंगाने केलेल्या ग्रामीण, खेडेगावातील अभ्यासामुळे या परिसरातील सर्व गीते, कथागीते, विधी, देवदेवता, सण, समारंभ एकूणच या ठिकाणच्या माणसाचे संपूर्ण जीवन समजण्यास मदत होईल असा आशावाद वाटतो. सदर धनगरी लोकगीताचा अभ्यास हा लोकसाहित्यातील भाग असल्याने मराठीच्या अभ्यासक्षेत्रातील अल्पसे योगदान ठरले तरी जीवनाच्या अनेक आघाडयावर झुंज देता देता घेतलेले परिश्रम धनगरांच्या खडतर जीवनासारखे, सार्थकी लागल्याचे समाधान ते तसे मौलिक योगदान ठरावे. यासाठी ज्यांनी ज्यांनी आटोकाट प्रयत्न केला त्यामध्ये माझ्या मार्गदर्शिका प्रा.डॉ.सौ.विमला पाटील (मॅडम) यांचा वाटा महत्वाचा आहे. त्याचप्रमाणे ॲडव्होकेट केशवराव पाटील, डॉ.शिवाजीराव चव्हाण, मा.प्राचार्य श्री.मा.के.यादव (छ.शिवाजी कॉलेज, सातारा), प्रा.श्री.आर.पी.पोळ, श्री.तांबे सर, मा.आ.लक्ष्मणराव माने, डॉ.विश्वनाथ शिंदे यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन केले.

ऐन कर्तृत्वाच्या उंबरठयावर बेकारीने ग्रासलेल्या खिन्न, उदासीन मनात आयुष्याच्या टाकाऊपणाची विचित्र जाण तीव्र होण्यापूर्वीच ज्यांनी मला संशोधन कार्यात गुंतवून वाया जाऊ पाहणाऱ्या क्षुद्र क्षणांचे मोल करण्याची प्रेरणा दिली त्या माझ्या कुटुंबाचा व नातलगांचा मी अविरत ऋणी आहे. त्यात "तू पोटभर शिक" ही आजीची शिकवण आजही वेळोवेळी मोलाची वाटते.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे खंडाळा तालुक्यातील शैक्षणिक संस्थेचे संस्थापक, समाजहितचिंतक मा.शंकरराव गाढवे (सर) यांचा सतत वरदहस्त असल्यानेच मला प्रेरणा मिळत गेल्या. डॉ.कुंडलकर यांच्या सहकार्यामुळेच एवढा खटाटोप झाला म्हणून त्यांचे आभार मानले नाही तर चुकीचे ठरेल.

छ.शिवाजी कॉलेजच्या "शिवाजी ग्रंथालयाचे" ग्रंथपाल प्रा.श्री.बी.एस.गायकवाड (सर), श्री.एस.एस.पावसकर, श्री.पी.आय.खान इत्यादी ग्रंथालयीन आणि प्रशासकीय सेवकांनी अनमोल सहकार्य केले. तसेच राजेंद्र विद्यालय खंडाळा, पंचक्रोशी विद्यालय पाडळी सुखेड बोरी, आर्टस, सायन्स ॲन्ड कॅामर्स कॅालेज लोणंद, लोणंद ग्रामपंचायत वाचनालय लोणंद, .वे प्राथमिक शाळा निंबोडी इ. ग्रंथालयांचे सहकार्य झाले. येथून ग्रंथ व पुस्तके उपलब्ध करून देणाऱ्या सर्व संबंधित प्राध्यापकांचे, शिक्षकांचे आणि सर्व ग्रंथालय प्रमुखांचे व सेवकांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

शिवाजी विद्यापीठाच्या "बी.यु.टी.आर." विभागाचे अधिकारी, इतर संबंधीत अधिकारी व मराठी विभाग प्रमुख, मराठी विभागाचे सहकारी प्राध्यापक, विद्यापीठाच्या लायब्ररीचे विभाग प्रमुख व त्यांचे सहकारी विद्यापीठातील इतर सहकारी या सर्वांनी मला मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले. यामुळे मी माझा प्रबंध पूर्ण करू शकलो. म्हणून मी या सर्वांचा ऋणी आहे. आभारी आहे.

या प्रबंधाचे टंकलेखन व बांधणी अत्यंत तत्परतेने व सुव्यवस्थितपणे करून देणारे "रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग," सातारा" चे श्री.मुकुंद ढवळे व त्यांचे सहकारी श्री.राजू कुलकर्णी यांचाही मी अत्यंत आभारी आहे.

माझ्या संशोधन कार्याला उत्तेजन देणाऱ्या आणि त्याबाबत सुयश चिंतणाऱ्या माझ्या सर्व हितचिंतकांचे , गुरूवर्यांचे व मित्रांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.


श्री.गुलाबराव तात्याबा शेळके

छ.शिवाजी महाविद्यालय, सातारा.

## अनुक्रमणिका – अंतरंग


| प्रकरण नं. प्रकरणाचे नांव | पान नं. |
|---|---|
| **प्रकरण 1– सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसराचा परिचय.** | 1–37 |
| (भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, औद्योगिक, धार्मिक इ.) | |
| **प्रकरण 2–** | 38–62 |
| अ) लोकसाहित्यचे स्वरूप व वैशिष्टये. | |
| ब) खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीतांचे स्वरूप व वैशिष्टये. | |
| **प्रकरण 3 –संकलित धनगरी लोकगीताचे रसास्वादात्मक विवरण** | 63–136 |
| अ) समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून धनगरी लोकगीतांचा अभ्यास. | |
| ब) खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीतांच्या विविध आविष्काराचे वाड्.मयीन विवेचन. | |
| 1) पुरूषगीते 2) स्त्रीगीते 3)बालगीते | |
| क) खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धार्मिक कुलाचार (देवदेवता, सण, वृत्ते इ.) | |
| ड) खंडाळा तालुक्यातील धनगरी लोकगीतातील निवडक देवदेवतांच्या कथा – (खंडोबा, बिरोबा, म्हस्कोबा, चाग्देव इ.) | |
| **प्रकरण 4– खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीते व लोकसंस्कृती यांचे बंध– अनुबंध** | 137–144 |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण 5 – | निष्कर्ष – समारोप. | 145–157 |
| परिशिष्ठये – | | 159–197 |
| अ. | लोपांद परिसरातील संकलीत केलेली लोकगीते | |
| ब. | मुलाखत | |
| क. | धनगरांची कुळी, आडनावे, गोत्र यांचा तक्ता. | |
| ड. | छायाचित्रे. | |
| संदर्भ ग्रंथ सूची. | | 198–200 |



## खंडाळा तालुक्यातील गाववार लोकसंख्या

## सन 1991 नुसार

| अ.क्र. | गाव | सांकेतिक क्रमांक | लोकसंख्या | अ.क्र. | गांव | सांकेतिक क्रमांक | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | अहिरे | 54 | 2193 | 20 | हरळी | 56 | 472 |
| 2. | अजनुज. | 36 | 746 | 21. | हरतली | 64 | 382 |
| 3. | आंबारवाडी | 37 | 539 | 22 | जवळे | 16 | 1410 |
| 4. | अंदोरी | 46 | 2296 | 23. | कनवडी | 18 | 659 |
| 5. | असवली | 38 | 2380 | 24. | कन्हेरी | 39 | 1844 |
| 6. | अतीट | 17 | 1185 | 25. | कन्हाडवाडी | 65 | 479 |
| 7. | बाळु पाटलाची वाडी. | 45 | 672 | 36. | कर्नवडी | 19 | 1145 |
| | | | | 27. | कवटे | 15 | 907 |
| 8. | बावडा | 30 | 2766 | 28. | केसुर्डी | 31 | 1036 |
| 9. | बावकलवाडी | 43 | 671 | 29. | खंडाळा | 33 | 4235 |
| 10. | भादवडे | 28 | 1178 | 30. | खेड बु।। | 53 | 3407 |
| 11. | भादे | 48 | 3338 | 31. | कोपर्डे | 62 | 1568 |
| 12. | भाटघर | 1 | 925 | 32. | लिंबाची वाडी | 23 | 432 |
| 13. | भोळी | 24 | 1697 | 33. | लोहोम | 20 | 991 |
| 14. | बोरी | 60 | 1356 | 34. | लोपांद | 52 | 12211 |
| 15. | धनगरवाडी | 8 | 941 | 35. | लोणी | 26 | 1178 |
| 16. | धावडवाडी | 55 | 1208 | 36. | मरीआईची वाडी | 51 | 685 |
| 17. | गाडगेवाडी | 21 | 438 | 37. | मावशी | 34 | 626 |
| 18. | घाटदरे | 57 | 595 | 38. | मीरजे | 13 | 1131 |
| 19. | गुधाळवाडी | 4 | 1016 | 39. | मोह तर्फ शिरवळ | 9 | 231 |

| अ.क्र. | गांव | सांकेतिक क्रमांक | लोकसंख्या | अ.क्र. | गांव | सांकेतिक क्रमांक | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 40. | मोर्वे | 49 | 1916 | 54. | शिंदेवाडी | 5 | 1708 |
| 41. | नायगाव | 11 | 1809 | 55. | शिरवळ | 6 | 8679 |
| 42. | निंबोडी | 59 | 1569 | 56. | शिवाजीनगर | 29 | 1714 |
| 43. | पाडळी | 61 | 2160 | 57. | सुखेड | 58 | 1379 |
| 44. | पाडेगाव | 44 | 1024 | 58. | तोंडल | 25 | 962 |
| 45. | पळसी | 12 | 2288 | 59. | वडगाव | 14 | 709 |
| 46. | पारगाव | 32 | 2341 | 60. | वडवाडी | 63 | 454 |
| 47. | पिंपरे बु।। | 42 | 1692 | 61. | वाघोशी | 50 | 820 |
| 48. | पिसाळवाडी | 7 | 753 | 62. | वान्याची वाडी | 35 | 410 |
| 49. | राजेवाडी | 2 | 436 | 63. | वाठार बु।। | 40 | 2091 |
| 50. | रूई | 41 | 375 | 64. | विंग | 3 | 2142 |
| 51 | सांगवी | 10 | 686 | 65. | झगलवाडी | 22 | 409 |
| 52. | शेडगेवाडी | 47 | 733 | | | | |
| | | | | | एकूण – | | 101105 |
| 53. | शेखमीरवाडी | 27 | 677 | | | | |